# <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०१८ वरील आदेश</u>

१. अर्जदार उज्वला विजय बंधान रा. २०२, छबाई विहंग गार्डन, समता नगर, पोखरण नं.१, ठाणे पश्चिम, जेकेग्राम, ठाणे, ता.जि.ठाणे हयांनी केला आहे की, त्यांचे वाहन महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचा बोलेरो प्लस एफ.बी.बी.१३, पांढ-या रंगाचा, त्याचा रजिस्ट्रेशन नंबर एमएच-४६-ई-५७३९, चेसीस नंबर-एम.ए.आय.झेड.एन.२जी.एच.के.ई.आय.ए १२९९९, इंजिन नंबर-जी.एच.डी.आय.एम.१२९९०, तसेच सदर गाडीचे आर.सी.बुक व सदर गाडीची चावी ही रेल्वे सुरक्षा बल, नांदगाव येथील पोलीसांनी गुन्हा क्र.१३९९/२०१७ कलम १५४, १५९ रेल्वे ॲक्ट अन्वये जप्त केली आहे. सदर जप्त केलले वाहन त्यांचे स्वतःचे नावे असुन ते परत घेणे त्यांना फारच आवश्यक आहे. सदर वाहन घरगुती कामाकरीता वापरत असल्यामुळे सदर गाडीची आवश्यकता लागते. सदर मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिला तर खराब होवून नुकसान होईल म्हणुन सदर मुद्देमाल योग्य शर्ती व अटीवर सुपुर्तनाम्यावर सुपुर्त करण्यात यावी अशी अर्जदार यांनी विनंती केली आहे. अर्जदाराने आर.सी.बुकची व त्यांच्या आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली आहे.

२. तपासी अधिकारी यांनी सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत करणेबाबत काहीही हरकत घेतलेली नाही व योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे. तसेच सरकारी अभियोक्ता यांनी सदर प्रकरणाचा तपास पुर्ण होईपावेतो सदर मुददेमाल परत करण्यात येवु नये अशी हरकत घेतली आहे व योग्य ते आदेश होणेची विनंती केली आहे.

३. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरण चालविण्यास वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तोपर्यंत जर मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये ठेवला तर अर्जदाराचे आर्थिक नुकसान होणार आहे व जप्त मुद्देमाल खराब होण्याची शक्यता देखिल नाकारता येत नाही. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्रांवरून प्रथमदर्शणी ते जप्त मुद्देमालाचे मालक दिसून येतात. म्हणुन याक्षणी खालील अटींवर न्यायहिताने अर्ज मंजुर करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. गुन्हा क्र. १३९९ / २०१७ रेल्वे सुरक्षा बल, नांदगाव मध्ये जप्त केलेला मुद्देमाल महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचा बोलेरो प्लस एफ.बी.बी.१३, पांढ-या रंगाचा, त्याचा रजिस्ट्रेशन नंबर एमएच-४६-ई-५७३९, चेसीस नंबर-एम.ए.

आय. झेड.एन.२जी.एच.के.ई.आय.ए १२९९९, इंजिन नंबर-जी.एच.डी. आय.एम.१२९९० तसेच सदर गाडीचे आर.सी.बुक व सदर गाडीची चावी तपासी अधिकारी यांनी अर्जदाराला परत करावा.

२. तपासी अधिकारी यांनी सदर मुद्देमाल परत करताना त्याचे चारही बाजुने छायाचित्र काढावे, पंचनामा करावा आणि सदर छायाचित्र आणि पंचनामा दोषारोपपत्रासोबत दाखल करावा.

३. अर्जदाराने त्यास सुपुर्तनाम्यावर दिलेल्या वाहनाचा रंग आणि स्वरूपामध्ये कोणताही बदल करू नये. तसेच त्या वाहनाची विक्री करू नये व कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये.

४. अर्जदाराने न्यायालय जेव्हा आदेश करेल त्यावेळी मुद्देमाल न्यायालयात दाखल करावा.

५. अर्जदाराने सदर मुद्देमालाकरीता रूपये ५,००,०००/- चा सुपुर्तनामा बंधपत्र रेल्वे सुरक्षा बल,नांदगाव येथे दाखल करावा.

६. संबंधित लिपिकाने या आदेशाची प्रत दोषारोपपत्रासोबत दाखल करावी.

दिनांक : ०५ जानेवारी २०१८
मनमाड लोहमार्ग

(एस.एन.हुरगट)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मनमाड लोहमार्ग.